**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः कअप-१२१७/प्र.क्र. ११९/१४-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १० एप्रिल, २०१८

संदर्भ :- १) या विभागाचे समक्रमांक दिनांक ०८.०२.२०१८चे आदेश
२) सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र. १८६/१४-ब, दिनांक ०९.०८.२०१६
३) सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/१४, दिनांक २३.१२.२०१६
४) सा.प्र.वि. शासन निर्णय,क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२.०९.२०१६

**शासन आदेश :-**

संदर्भाधीन क्रमांक १ च्या आदेशान्वये खालील विवरणपत्रातील नमूद सहायक कक्ष अधिकारी यांना कक्ष अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देऊन, त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर रकाना क्रमांक ६ मध्ये दर्शविलेल्या विभागामध्ये करण्यात आली आहे. तथापि, सदर सहायक कक्ष अधिकारी यांना संबंधित विभागामधून अद्याप कार्यमुक्त करण्यात आलेले नाही.

| अ. क्र. | श्री/ श्रीमती | नाव | प्रवर्ग | सध्याचा विभाग | पदोन्नतीनंतरचा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री | ग.ध.दाभिळकर | अजा | महसुल व वन विभाग | गृह विभाग |
| २ | श्रीमती | यो.सं.देसाई | अजा | जलसंपदा विभाग | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग |
| ३ | श्री | प्र.वि.कदम | खुला | गृह विभाग | महसुल व वन विभाग |

२. संदर्भाधीन क्रमांक २ व ३ येथील शासन परिपत्रक/ शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त ०३ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोरील रकाना क्रमांक ५ येथील नमूद विभागातून रकाना क्रमांक ६ येथील पदोन्नतीनंतरच्या विभागात रुजू होण्यासाठी या आदेशाद्वारे एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. उपरोक्त सहायक कक्ष अधिकाऱ्यांनी इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता त्यांच्या नावासमोर रकाना क्रमांक ६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागात तत्काळ रूजू व्हावे.

३. संबंधित सहायक कक्ष अधिकारी हे कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीनंतर पदस्थापना केलेल्या विभागामध्ये या आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत रूजू न झाल्यास त्यांना कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नतीमध्ये स्वारस्य नसल्याचे गृहित धरुन त्यांची कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच सा.प्र.वि. शासन आदेश दिनांक १२.०९.२०१६ नुसार संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांनी कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती स्विकारण्यास नकार दर्शविल्याचे गृहित धरुन त्यांचे नाव सन २०१७-२०१८ च्या निवडसूचीमधून वगळण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या

निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीमध्ये त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०१५५६३९७३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.04.10 15:58:08 +05'30'

( ग. भि.गुरव )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

सर्व संबंधित सहायक कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)
३. सह/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. निवडनस्ती.